# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:04.08.2025** **वार:सोमवार**

1. भारतीय रेल्वेचं मोठ्या प्रमाणावर परिवर्तन होत असल्याचं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचं प्रतिपादन, पुणे ते रेवासह अन्य रेल्वेगाड्यांना हिरवा झेंडा
2. राज्याचा महसूल विभाग अधिक सक्षम आणि लोकस्नेही करण्याचा शासनाचा प्रयत्न- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस
3. राज्यात अवयवदान पंधरवड्याला प्रारंभ, 15 ऑगस्टपर्यंत विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचं आयोजन आणि
4. भारत-इंग्लंड दरम्यानच्या पाचव्या कसोटी सामन्यात इंग्लंडला विजयासाठी 35 धावांची आवश्यकता

**रेल्वे**

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल गुजरातमधील भावनगर रेल्वेस्थानकावरून पुण्याहून मध्य प्रदेशातल्या रेवा इथं जाणाऱ्या पहिल्या रेल्वे गाडीला दूरस्थ पद्धतीनं हिरवा झेंडा दाखवला. यावेळी त्यांच्या हस्ते भावनगर ते अयोध्या या साप्ताहिक गाडीचा तसंच अन्य काही मार्गांवरील नव्या रेल्वेगाड्यांचाही दूरस्थ पद्धतीनं आरंभ करण्यात आला. यावेळी बोलताना ते म्हणाले.....

**ये तीनों गाड़ियां बहुत इम्पोर्टेंट है। पुणे आज एक बहुत बड़ी औद्योगिक नगरी है। एजुकेशन हब है और रीवा से जबलपुर से सतना से मैहर से उस पूरे अंचल से पूरे मध्यप्रदेश से एक तरीके से पुणे का जुड़ाव होता है। कुछ ही दिन पहले ग्वालियर अंचल से बेंगलुरु का जुड़ाव हुआ था। और वैसे ही जबलपुर और रायपुर दोनों आपस में एक तरीके से उस पूरे आदिवासी बहुल अंचल के लिए भी बहुत ही इम्पोर्टेंट एक ट्रेन रहेगी ये कनेक्टिविटी बहुत ज़रूरी है।**

गेल्या अकरा वर्षात 34 हजार किलोमीटरचे नवे रेल्वेमार्ग तयार झाले असून भारतीय रेल्वेचं मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत आहे, रेल्वेमार्गाचं जाळं विकसित करण्यासाठी आणि रेल्वेची सुरक्षितता आणि स्वच्छता राखण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं अश्विनी वैष्णव यावेळी म्हणाले. देशातल्या तेराशे रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास प्रकल्प हा जगातला सर्वात मोठा प्रकल्प असल्याचंही त्यांनी यावेळी सांगितलं.

**महसूल परिषद समारोप**

महसूल विभाग राज्याच्या आर्थिक विकासाचा कणा असून तंत्र कौशल्याच्या बळावर हा विभाग अधिकाधिक सक्षम आणि लोकस्नेही करण्याचा प्रयत्न राज्य शासन करत आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपूर इथं सांगितलं. भारतीय व्यवस्थापन संस्था अर्थात आयआयएम नागपूर इथं आयोजित महसूल परिषदेतील चर्चासत्रात ते बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत या दोन दिवसांच्या परिषदेचा काल समारोप झाला. यावेळी राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, यांच्यासह महसूल विभागाशी संबंधित अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**सीमएम अमरावती-मुंबई**

राज्य शासनाने मत्स्य व्यवसायाला शेतीचा दर्जा दिल्यामुळे मत्स्य व्यवसाय आज प्राधान्याचं क्षेत्र झालं आहे, असं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलं. अमरावती जिल्ह्यातील मोर्शी इथं शासकीय मत्स्य विज्ञान महाविद्यालयाच्या

भूमिपूजन समारंभात ते काल बोलत होते. पंतप्रधानांच्या दृष्टिकोनानुसार आपल्या नद्या आणि तलावांचा वापर करून देशात नीलक्रांती करण्यासाठी सरकार अनेक योजना राबवत असल्याचं त्यांनी सांगितलं.

**गडकरी-मुंबई**

देशात मालवाहतुकीवरचा खर्च पूर्वी 16 टक्के होता. तो चांगल्या रस्त्यांमुळे आता 10 टक्क्यांवर आला आहे आणि भविष्यात तो 9 टक्क्यांवर आणण्याचा आपला प्रयत्न असल्याचं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी काल सांगितलं. भारतीय उद्योग महासंघाच्या विदर्भ विभागीय कार्यालयाचं उद्घाटन केल्यानंतर ते काल नागपुरात बोलत होते.

**अवयवदान पंधरवडा**

राज्यातलं अवयवदानाचं प्रमाण वाढावं तसंच अवयवदानाच्या प्रतीक्षेतील रुग्णांना नवजीवन मिळावं या उद्देशानं कालपासून राज्यभर अवयवदान पंधरवड्याचा प्रारंभ करण्यात आला आहे. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी अवयवादानाची शपथ घेऊन आणि अर्ज भरून या अभियानाचा आरंभ केला. राज्यातील जनतेनं या अभियानामध्ये सहभागी होऊन अवयवदानाची शपथ घ्यावी, असं आवाहनही आरोग्यमंत्र्यांनी यावेळी केलं. हे अभियान 15 ऑगस्टपर्यंत राबविण्यात येणार आहे. या कालावधीत शाळा, महाविद्यालयं, स्वयंसेवी संस्था, आरोग्य संस्था आणि सामाजिक कार्यकर्ते व्यापक जनजागृतीपर आणि समाजाभिमुख उपक्रम राबवणार आहेत.

**क्रांतिसिंह जयंती**

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील थोर सेनानी, प्रतिसरकारचे प्रणेते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त काल राज्यात विविध ठिकाणी त्यांना अभिवादन करण्यात आलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपूर इथल्या शासकीय निवासस्थानी क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केलं. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनीही, क्रांतिसिंह नाना पाटील यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन केलं.

**राष्ट्रपती आमंत्रण-बुलडाणा**

येत्या स्वातंत्र्य दिनी राष्ट्रपती भवनात होणाऱ्या विशेष कार्यक्रमासाठी पर्यावरणस्नेही उत्पादनं तयार करणारे पुण्यातले उद्योजक शशांक मिश्रा यांना निमंत्रित करण्यात आलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या कार्यालयातून पाठविण्यात आलेलं हे विशेष निमंत्रण टपाल विभागाच्या अधिकाऱ्यांनी शशांक मिश्रा यांना दिलं. त्यावेळी मिश्रा आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हणाले.....

**मैं ज़ोलपैक इंडिया लिमिटेड का मैनेजिंग डायरेक्टर, फाउंडर एंड सीईओ हूँ। मैं नेशनल क्रेडिट गारंटी ट्रस्ट और राष्ट्रपति जी का आभार व्यक्त करता हूँ। उन्होंने मुझे सम्मान देने के लिए बुलाया है। पंद्रह अगस्त को इवनिंग को इसका मैं बहुत बहुत शुक्रगुजार हूँ। राष्ट्रपति जी का गवर्नमेंट ऑफ इंडिया का और नेशनल क्रेडिट गारंटी ट्रस्ट का और पुणे पोस्ट का बहुत-बहुत आभार व्यक्त करता हूँ और अभिनंदन करता हूँ कि उन्होंने आके मुझे ये सम्मान दिया अपने हाथों से डिलीवर किया और पर्सनली मुझे कांग्रेचुलेट किया और मेरा अभिनंदन किया इसके लिए बहुत बहुत धन्यवाद।**

**चंद्रपूर कामगिरी- धाराशिव**

'आकांक्षित जिल्हे आणि तालुके' कार्यक्रमांतर्गत गेल्या वर्षी 1 जुलै ते 30 सप्टेंबर या कालावधीत राबविण्यात आलेल्या संपूर्णता अभियानामध्ये चंद्रपूर जिल्ह्यानं केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जिल्हाधिकाऱ्यांचा सुवर्णपदक देऊन गौरव करण्यात आला. जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांच्या वतीनं प्रभारी जिल्हाधिकारी डॉ. नितीन व्यवहारे यांनी हा गौरव स्वीकारला. या अभियानात धाराशिव जिल्ह्याला कास्य पदक मिळालं आहे. तसंच धाराशिव जिल्ह्यातील परंडा तालुक्यालाही कास्य पदक मिळालं आहे. धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांना काल नागपुरात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**पीएम किसान लाभार्थी**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा विसावा हप्ता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शनिवारी जारी करण्यात आला. हा आर्थिक मदतीचा हप्ता मिळाल्याबद्दल बारामती इथले लाभार्थी खंडेराव घाडगे यांनी समाधान व्यक्त केलं आहे.....

**माझं नाव खंडेराव रंगराव घाडगे मुक्काम पोस्ट गुणवडी तालुका बारामती जिल्हा पुणे. मी सुरुवातीपासूनचा पीएम किसान योजनेचा लाभ घेत आहे आणि या योजनेचा मला योग्य वेळेला शेतीतील बीबियाणे खतं औषधं यासाठी योग्य अशाप्रकारे त्याचा उपयोग होतो आणि त्यातून माझ्या शेतीच्या उत्पादनामध्ये चांगल्यापैकी उत्पादनात वाढ झालेली आहे. त्याचा चांगला फायदा मला झालेला आहे आजपर्यंत आणि आता होतोय.**

**यवत हिंसा**

पुणे जिल्ह्यात यवत इथे झालेल्या हिंसाचाराप्रकरणी आतापर्यंत 15 जणांना अटक झाली असून 500 हून अधिक जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक केलेल्या 15 आरोपींना 6 ऑगस्टपर्यंत न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात येणार आहे. हिंसाचाराला कारणीभूत ठरलेली वादग्रस्त पोस्ट करणाऱ्या तरुणालाही अटक करण्यात आली आहे.

**क्रिकेट**

ओव्हल इथं सुरू असलेल्या अँडरसन तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतील पाचव्या आणि अंतिम सामन्यात काल चौथ्या दिवशी अपुऱ्या दृश्यमानतेमुळं खेळ थांबवण्यात आला तेव्हा इंग्लंडच्या दुसऱ्या डावात सहा गडी बाद 339 धावा झाल्या होत्या. ज्यो रूटनं 105 आणि हॅरी ब्रुकनं 111 धावा केल्या. आज पाचव्या दिवशी सामना जिंकण्यासाठी इंग्लंडला 35 धावांची तर भारताला विजयासाठी चार बळींची आवश्यकता आहे.

**हवामान**

राज्यात तुरळक ठिकाणी पावसाच्या सरी पडण्याची शक्यता असून विदर्भ आणि मराठवाड्यात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज हवामान विभागांनं वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.